# सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दल
# पोलीस शिपाई भरती
# सन २०२२ - २०२३

## - उमेदवारांकरीता सुचना -

- सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस भरती २०२२-२०२३ मधील उमेदवारांना मैदानी चाचणीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश), नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा यामधील नियम ४ (२) नुसार मैदानी चाचणीत किमान ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवारांची गुणवत्तेनुसार संबंधित प्रवर्गातील जाहिरातीत नमुद केलेल्या रिक्त पदांच्या ०१:१० प्रमाणात लेखी परीक्षेसाठी निवड करण्यात आलेली आहे.
- सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३ मधील पोलीस शिपाई पदाची लेखी परीक्षा दिनांक १८/०७/२०२४ रोजी खालील ठिकाणी व वेळी आयोजित करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | चेस्ट क्रमांक | परिक्षा केंद्राचे ठिकाण | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ६ ते १५५२<br>(५०४ पुरुष उमेदवार) | जिल्हा क्रिडा संकुल बहुउद्देशीय हॉल, सिंधुदुर्गनगरी, ओरोस ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग | सकाळी १०.०० वा. |
| २ | १५५४ ते २७८०<br>(४१४ पुरुष उमेदवार) | शरद कृषि भवन, पोस्ट ऑफीस समोर, सिंधुदुर्गनगरी, ओरोस ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग | |
| ३ | ३००१ ते ३६२९<br>(३०८ महिला उमेदवार) | | |
| ४ | ४००५ ते ४८११<br>(२४ महिला/पुरुष उमेदवार) | होमगार्ड कार्यालय, सिडको भवन समोर, सिंधुदुर्गनगरी, ओरोस ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग | दुपारी १५.०० वाजता |

- लेखी परिक्षेसाठी महाआयटी कडुन प्रवेशपत्र निर्गमित करण्यात आलेले असून ते http:policerecruitment२०२२.mahait.org या वेबसाईटवरुन उमेदवारांनी आपला युजर आयडी व पासवर्डचा वापर करुन प्रवेशपत्र डाऊनलोड करुन स्पष्ट दिसेल अशी प्रिंट काढावी.
- उमेदवारांनी लेखी परिक्षेकरिता दिनांक १८/०७/२०२४ रोजी त्यांना प्रवेश पत्रात नमुद केलेल्या परिक्षा केंद्रावर शरिरीक चाचणीवेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र/ओळखपत्र, लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र घेवुन २ तास अगोदर उपस्थित रहावे. तरच उमेदवारांना परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल, अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.
- उमेदवारांने स्वत:ची ओळख पटविण्यासाठी शासनाने जारी केलेले आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान कार्ड, पासपोर्ट, महाविदयालयीन ओळखपत्र, वाहन परवाना, यापैकी कोणतेही एक मुळ आणि वैध ओळखपत्र व ऑनलाईन प्रवेशपत्राची प्रत ( हॉल तिकीट ) व ०२ फोटो सोबत आणावे, अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.
- उमेदवाराना सदर लेखी परिक्षेसाठी या कार्यालयाकडून काळे पेन व पॅड पुरविण्यात येणार आहेत. उमेदवारांनी सोबत येताना इतर अनावश्यक वस्तु आणु नये, आणल्यास सदरच्या वस्तु परिक्षा केंद्राच्या बाहेर ठेवण्यात येतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

Scanned with OKEN Scanner

- उमेदवारास परीक्षा वर्गावर मोबाईल, घडयाल, ब्लु-टुथ, डिजीटल डायरी, मायक्रोफोन, कॅल्क्युलेटर, नोट पॅड, नोट बुक, तसेच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे, प्रतिबंधक वस्तु स्वत: जवळ बाळगणेस पुर्णत: मनाई आहे. अशा वस्तु आढळल्यास उमेदवारास भरती प्रक्रियेतून बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्याबरोबर गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
- एखादा उमेदवार लेखी परीक्षेस गैरहजर राहिल्यास, तर त्याला पुन्हा लेखी परीक्षा घेण्याबाबत कोणतीही अतिरिक्त संधी देण्यात येणार नाही. त्याला संपुर्ण भरती प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.
- उमेदवारांने भरती प्रक्रियेमध्ये उध्दट गैर वर्तन/ अनुचित प्रकार केल्यास किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरण्याचा कॉपी करण्याचा अथवा डमी उमेदवार बसविण्याचा प्रयत्न केल्यास त्यास त्याच क्षणी भरती प्रक्रियेतून बाद करुन कायदेशिर कारवाई करण्यात येईल.
- उमेदवार अगर त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही एजंट/ दलाल, अधिकारी/ कर्मचारी यांच्या भुलथापांना/ अमिषाला बळी पडु नये. उमेदवारांची निवड ही सर्व निकष गुणवत्तेच्या पात्रतेवर होईल.

ठिकाण :- सिंधुदुर्ग
दिनांक :- १२/०७/२०२४

(कृषिकेश रावले)
अध्यक्ष
पोलीस भरती निवड मंडळ, तथा
प्रभारी पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग

Scanned with OKEN Scanner